रेमुनं ७६/२०१६ मधील नि. क्र. ३८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रवादी क्र ३ याने दाखल केला आहे. प्रवादीचे अर्जातील कथन असे की, सदर प्रवादी ही वयोवृध्द आहे. तिचे वय ८० आहे. तिला चालता फिरता येत नाही, दिसत नाही. त्यामुळे मे. कोर्टात मुदतीत हजर राहून कैफियत देवू शकत नाही. प्रवादीचे पुढे कथन असे की, प्रवादीला तिचे दाव्यात काम पाहण्यासाठी मुखत्यार नेमावे लागले, त्याला माहीती दयावी लागली. यासाठी प्रवादी क्र ३ चा वेळ गेला त्यामुळे वेळेत कैफियत देता आली नाही. यापुढे प्रवादी क्र३ चे मुखत्यार हजर राहून काम पाहतील.

२. प्रवादीचे पुढे असे कथन की, प्रवादी क्र ३ विरुध्द विना कैफियत आदेश पारीत झालेला आहे. सबब प्रवादी क्र ३ चे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रदद व्हावा व प्रवादी क्र ३ ची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने त्याचे म्हणणे सदर अर्जावरच दिले आहे. वादीचे असे कथन की, अर्जातील मजकूर खोटा आहे. तसेच दाव्याचे समन्स नोटीस लागूनही मुदतीत जाणीवपूर्वक कैफियत दली नाही. मुखत्यारपत्र कधीही करु शकतात. तरी प्रवादींनी कोणताही पुरावा दिलेला नाही. सोबत मेडीकल सर्टिफिकेट दिलेले नाही. मोघम अर्ज दिलेला आहे. सबब अर्ज रदद करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. पुकारा केला असता वादी हजर व प्रवादी गैरहजर. युक्तीवादाकामी दोन्ही बाजुंचे विधीज्ञ यांचा पुकारा केला असता ते गैरहजर. त्यामुळे अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात येतो.

५. अभिलेखानुसार प्रवादी क्र ३ हा प्रस्तुत दाव्यात नि क्र २८ नुसार दि. ३०/०४/२०१६ रोजी हजर झाला आहे. त्यानंतर सदर प्रवादीने दि.०३/०८/२०१६ पावेतो त्याची लेखी कैफियत ही ९० दिवसांचे आत दाखल केली नाही. त्यामुळे त्याचेविरुध्द नि. क्र १ वर दि. ०३/०८/२०१६ रोजी संचिका विनाकैफियत चालवणेबाबतचा आदेश पारीत करण्यात आला. वादीची हरकत लक्षात घेतली. वादपत्र हे शेतजमीन मिळकतबाबत असून प्रवादी क्र ३ चे वय हे ८० वर्षावरील असल्याचे दिसून येते. वादपत्र हे दावा निरंतर ताकीह हूकूम मिळणेकामी प्रवादी क्र १ ते ३ यांचेविरुध्द वादीने दाखल केला आहे. त्यामुळे प्रवादी क्र ३ यास उचित संधी मिळणेकामी त्यास

झालेला विलंब हा माफ करण्यात येतो. त्यामुळे दोन्ही बाजुंना समसमान संधी मिळणेकामी व योग्य त्या न्यायदानाचे दृष्टीने मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करतो

<u>आदेश</u>

१. अर्ज खर्च रक्कमेवर वर मंजूर.

२. प्रवादी क्र.३ याने वादी यांने खर्च रक्कम रु.४००/- पुढील तारखेपावेतो देणे अन्यथा अर्ज खारीज समजण्यात यावा.

दि. १६/११/२०१६

२रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर
शेवगाव.